Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 8TH JULY 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

मुंबईचे गव्हरनर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आलीजाह् गव्हर्नर साहेब बहादूर यांनीं तारीख २३ माहे मार्च सन १८९७ रोजीं, आणि आलीजनाब व्हाइसराय व गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २४ माहे एप्रिल सन १८९७ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९७ चा मुंबईचा आक्ट २ रा.

**सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.**

( या आक्टास हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांनीं दिलेली मंजुरी, मुंबईचे गव्हर्नर यांनीं तारीख २६ माहे मे सन १८९७ रोजीं प्रसिद्ध केली होती. )

ज्याअर्थीं सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट खालीं सांगितल्या रीतीनें सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:

१. सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट, ज्यास ह्यापुढें सदरहू आक्ट ह्मटलें आहे, त्याच्या २ ऱ्या कलमांत खालील पोटकलम जास्त दाखल करावें, आणि तें त्यांत नेहेमी होतें असें समजावें. तें पोटकलम येणेंप्रमाणें :— कलम २ ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

"(३) आणि सन १८८७ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट ह्याअन्वयें केलेल्या ज्या ज्या कानू व नेमणुका, प्रसिद्ध करण्यांत आलेले जे जे जाहिरनामे आणि देण्यांत आलेले जे जे अधिकार, हा आक्ट अमलांत यावयाच्या तारखेस अमलांत असतील त्या त्या कानू व नेमणुका आणि ते ते जाहिरनामे व अधिकार, ह्या आक्टाला विरुद्ध नसतील तेथवर, अनुक्रमें ह्या आक्टाअन्वयें केलेल्या आहेत, आणि प्रसिद्ध केलेले व दिलेले आहेत असें समजावें."

२. (१) सदरहू आक्टाचें कलम ६, पोटकलम (१), ह्यांत "कोणत्याही" ह्या शब्दाच्या आधीं, "पोटकलम (२) ह्यांतील विशेष ठराव लागू राहून" हा मजकूर दाखल करावा. कलम ६ ह्याची सुधारणा.

(२) त्याच कलमाचें पोटकलम (२) ह्याच्याबदलीं खालील पोटकलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें :—

"(२) मात्र इतकेंच कीं—

नवीन बॉयलरांच्या संबंधानें विशेष ठराव.

(इ) ज्या कोणत्याही बॉयलरबद्दल पूर्वी कोणताही दाखला दिलेला नसेल त्या बॉयलरच्या बाबतींत तावडतोब दाखला देण्यास इन्स्पेक्टर असमर्थ असेल तर, त्यानें, तो बॉयलर तपासल्यानंतर लगतच्या ४८ तासांच्या आंत, त्या बॉयलरच्या मालकास एक हंगामी हुकूम लिहून दिला पाहिजे; आणि त्या हुकुमांत, दाखला देण्यांत किंवा देण्याचें नाकारण्यांत येई तोंपर्यंत, तो बॉयलर त्याच्या मतें किती दाबानें चालवतां येईल तें निर्दिष्ट केलेलें असलें पाहिजे; आणि पोटकलम (१), रकम (ड) यांतील ठराव लागू राहून, त्या मालकानें, दाखला देण्यांत किंवा देण्याचें नाकारण्यांत येई तोंपर्यंत, अशा हंगामी हुकुमाअन्वयें तो बॉयलर चालू ठेवणें कायदेशीर होईल;

दाखला दिलेल्या बॉयलरां-संबंधानें विशेष ठराव.

(फ) पोटकलम (१), रकम (ड) यांतील ठराव लागू राहून, जो कोणत्याही बॉयलरचा मालक पोटकलम (१) वरून जरूर असल्या प्रकारचा त्या बॉयलरासंबंधानें दाखला धारण करीत असेल, आणि जो अशा दाखल्याची मुदत संपण्यापूर्वी, अशी मुदत संपल्यानंतर त्या बॉयलरचा उपयोग करण्याचें चालू ठेवण्याचा आपला इरादा आहे ह्मणून नोटीस देईल; त्यास, तो बॉयलर तपासल्यानंतर इन्स्पेक्टरानें लेखी हुकूम करून त्या बॉयलरचा उपयोग करण्याचें अगदीं बंद ठेवण्याबद्दल फर्माविलें नाहीं तर, नवीन दाखला देण्यांत किंवा नाकारण्यांत येई तोंपर्यंत त्या बॉयलरचा उपयोग करण्याचें किंवा करूं देण्याचें चालू ठेवण्याचा अख्त्यार आहे, परंतु त्यानें—

(१) मुदत संपलेल्या दाखल्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल, किंवा

(२) इन्स्पेक्टरानें तो बॉयलर तपासून जो कोणताही हंगामी हुकूम लिहून दिलेला असेल, त्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल,

त्या दाबापेक्षां कोणत्याही अधिक दाबानें त्या बॉयलरचा उपयोग करूं नये किंवा करूं देऊं नये;

एकाच मालकाच्या बॉयलरां-च्या दोन साजांच्या संबंधानें विशेष ठराव.

(ग) जे बॉयलर एकाच मालकाचे असून जे असे बसविले असतील कीं त्यांपैकीं कोणत्याही एका बॉयलराचें अंतर त्यांपैकीं दुसऱ्या कोणत्याही बॉयलरापासून एक हजार फुटांपेक्षां जास्त नाहीं, त्या बॉयलरांपैकीं दोहोंपेक्षां जास्त नसणाऱ्या साजांची व्यवस्था पाहण्यासाठीं व ते ताब्यांत घेण्यासाठीं जो कोणताही मनुष्य नेमिला जाईल त्या मनुष्यास, त्या बॉयलरांच्या दरम्यान सदरीं सांगितल्याप्रमाणें अंतर असलें तरी, त्या सर्व बॉयलरांची प्रत्यक्ष रीतीनें व स्वतः व्यवस्था करण्यासाठीं आणि ते सर्व बॉयलर आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं नेमिलेलें आहे असें समजलें पाहिजे."

(३) आणि खालील मजकूर पोटकलम (३) ह्मणून दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:—

हंगामी हुकुमाची मुदत संपणें आणि तो परत स्वाधीन करणें

"(३) या कलमाअन्वयें दिलेला कोणताहि हंगामी हुकूम हा, कोणत्याहि बॉयलराबद्दल कोणताही दाखला किंवा नवीन करून दिलेला दाखला देण्यांत आल्यानंतर किंवा नाकारण्यांत आल्यानंतर, अगर असा हंगामी हुकूम परत स्वाधीन करण्यांत यावा

ह्मणून कलेक्टराकडून किंवा ह्या बाबतींत सामान्यतः किंवा विशेषतः लेखी अधिकार दिलेल्या कोणत्याही मनुष्याकडून अशा बॉयलरच्या मालकास लेखी हुकूम पोहंचल्यानंतर, अमलांत राहणार नाहीं. "

३. सदरहू आक्टाच्या ११ व्या कलमांत " पुऱ्या मुदतीचा " ह्या शब्दांनंतर " किंवा दाव्याचा " हे शब्द दाखल करावे. कलम ११ ह्याची सुधारणा.

४. (१) सदरहू आक्टाचें कलम १२ पोटकलम (१) यांत, " तो बॉयलर मुंबई शहरांत असला तर तो अर्ज पोहंचल्याच्या तारखेनंतर चार दिवसांच्याआंत, व तो बॉयलर इतर ठिकाणीं असला तर तो अर्ज पोहंचल्याच्या तारिखेनंतर दहा दिवसांच्या-आंत " ह्या मजकुराच्याबदला खालील मजकूर दाखला करावा. तो येणेंप्रमाणें :— कलम १२ ह्याची सुधारणा.

" तो बॉयलर जर—

(अ) मुंबई शहरांत असला, तर तो अर्ज पोहंचल्याच्या तारखेनंतर दिवसांच्याआंत,

(ब) एडनमध्यें असला, तर तो अर्ज पोहंचल्याच्या तारखेनंतर एका महि-न्याच्याआंत, आणि

(क) इतर ठिकाणीं असला, तर तो अर्ज पोहंचल्याच्या तारखेनंतर दाहा दिवसांच्या आंत. "

(२) त्याच कलमाचें पोटकलम (२) ह्यांत, " त्या मुदतीचा " ह्या शब्दांनंतर " आणि जो दाव असण्याविषयीं परवानगी देणें योग्य वाटेल त्या दाव्याचा " हे शब्द दाखल करावे.

५. सदरहू आक्टाचें कलम १६ ह्यांत— कलम १६ ह्याची सुधारणा.

(अ) " कलम १०, १२ अगर १४ याअन्वयें ज्या मुदतीबद्दल दाखला दिलेला असेल " ह्या मजकुराच्याऐवजीं " कलम ६, पोटकलम (२) ह्याअन्वयें हंगामी हुकूम किंवा कलम १०, १२ अगर १४ ह्या-अन्वयें दाखला ज्या मुदतीबद्दल दिलेला असेल " हा मजकूर दाखल करावा, आणि

(ब) त्याच कलमांत " तो " आणि " दाखला " ह्या शब्दांच्या दर्म्यान " हंगामी हुकम अगर " हे शब्द दाखल करावे.

६. (१) सदरहू आक्टाचें कलम १८, पोटकलम (१), ह्यांत— कलम १८ ह्याची सुधारणा.

(अ) " दाखला " हा शब्द तीन ठिकाणीं आला आहे त्या तीनही ठिकाणीं त्या शब्दाच्यापूर्वीं " हंगामी हुकूम अगर " हे शब्द दाखल करावे;

(ब) " सर्व वाजवी वेळीं " ह्या शब्दांनंतर, " मुंबईच्या कलेक्टरानें अगर " हे शब्द दाखल करावे ;

(क) " अशा माजिस्ट्रेटानें किंवा कलेक्टरानें " ह्या शब्दांच्याबदला " सदरहू शहरांत अशा कलेक्टरानें किंवा माजिस्ट्रेटानें अगर इतर ठिकाणीं अशा कलेक्टरानें " हा मजकूर दाखल करावा.

(२) त्याच कलमाचें पोटकलम (२) ह्याच्याबदला खालील पोटकलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

" (२) कोणत्याही बॉयलरबद्दल दिलेला हंगामी हुकूम किंवा दाखला अमलांत असेल त्या मुदतींत जो कोणताही मनुष्य त्या बॉयलरचा मालक होईल, त्यास अगो-दरच्या मालकाकडून तो हंगामी हुकूम किंवा तो दाखला मिळण्याचा हक्क प्राप्त होऊन, तो पोटकलम (१) ह्यांतील ठरावांस पात्र होईल. "

कलम २४ ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

७. सदरहू आक्टाचें कलम २४, पोटकलम ( ३ ) यांत खालील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:—

" असा जाहिरनामा प्रसिद्ध झाला ह्मणजे अशा एन्जिनियरचा दाखला रद्द करण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे:

" मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा एन्जिनियरानें जर आपण सदरहूप्रमाणें निघून गेल्याबद्दल अगर आपला दाखला हजर करण्यास चुकल्याबद्दल गव्हर्नर इन् कौन्सिल यांची खात्री होईल असा खुलासा केला, तर, त्यांस, कोणत्याही वेळीं, तो दाखला रद्द करण्याबद्दलचा सदरहू प्रकारचा कोणताही हुकूम परत घेण्याचा आणि सदरहूप्रमाणें रद्द केलेला दाखला त्या एन्जिनियरास परीक्षा घेतल्याशिवाय पुनः देण्याचा अधिकार आहे.

" आणि अशा रीतीनें पुनः दिलेल्या दाखल्याचा अमल, तो दाखला परीक्षा घेऊन दिलेला असल्याप्रमाणेंच चालेल. "

कलम २८ ह्याची सुधारणा.

८. सदरहू आक्टाचें कलम २८, रकम ( ब ), हींत, " दाखला " ह्या शब्दाच्यापूर्वीं " हंगामी हुकूम अगर " हे शब्द दाखल करावे.

कलम २९ ह्याची सुधारणा.

९. (१) सदरहू आक्टाचें कलम २९, पोटकलम (१), रकम ( अ ), हींत " दाखल्यांवांचून " ह्या शब्दाच्यापूर्वीं " हंगामी हुकुमावांचून अगर " हे शब्द दाखल करावे.

(२) त्याच कलमाचें पोटकलम (१), रकम ( क ), हींत, " दाखल्यावरून " ह्या शब्दाच्यापूर्वीं " हंगामी हुकुमावरून अगर " हे शब्द दाखल करावे.

कलम ३५, रकम (ड), हींत जास्त मजकूर दाखल करणें.

१०. सदरहू आक्टाचें कलम ३५, रकम ( ड ), हींत खालील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें :—

" आणि तसेंच कलम २६ अन्वयें दिलेल्या डुप्लिकेट दाखल्यांबद्दल द्यावयाची फी ठरविण्याबाबद."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

एस्. एल्. ब्याचलर,

सेक्रेटरी निसबत मुंबईच्या गव्हर्नरांचें कायदेकानू करणारें कौन्सिल.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख २९ माहे मे सन १८९७.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.